महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व,
मुंबई – ४०००५१. ☎ ०२२-६६४०५०६६/७७.
ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा
MHADA

=======================================================================

जावक क्रमांक –०४/३०४७०६३ दिनांक :- ०२ फेब्रुवारी, २०२६

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडा मुंबई मंडळातर्फे 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' तत्त्वावरील १२० सदनिकांच्या विक्रीसाठी ५ फेब्रुवारीपासून ऑनलाइन अर्ज नोंदणी

**ऑनलाइन अर्ज सादर करणे, अनामत रक्कम भरणे, अर्ज शुल्क भरणा, योजना/सदनिका निश्चिती करणे प्रक्रिया १२ फेब्रुवारीपासून**

मुंबई, दि. ०२ फेब्रुवारी, २०२६ :- म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या अखत्यारीतील विविध वसाहतींमधील १२० सदनिका 'प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येत असून, यासाठी म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज नोंदणीची प्रक्रिया दि. ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून सुरू होणार आहे.

म्हाडाच्या मुंबई मंडळामार्फत ही संधी उपलब्ध करून देण्यात येत असून, यापूर्वी सोडतीद्वारे विक्रीसाठी जाहीर करण्यात आलेल्या मात्र विविध कारणांमुळे रिक्त राहिलेल्या सदनिकांचा यात समावेश आहे. इच्छुक नागरिकांनी https://bookmyhome.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज नोंदणी करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन म्हाडाकडून करण्यात आले आहे.

अर्जदारांनी अर्ज करण्यासाठी म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रथम नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाइन अर्ज सादर करणे, अनामत रक्कम भरणे, अर्ज शुल्क भरणा, योजना/सदनिका निश्चिती करणे या प्रक्रियेला दि. १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून सुरुवात होणार आहे. सदनिकेच्या विक्री किमतीचा १० टक्के रकमेचा भरणा सदनिका निश्चिती केल्यानंतर ४८ तासांच्या आत अर्जदाराने करणे आवश्यक आहे.

'प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर मंडळाने बांधलेल्या शिंपोली कांदिवली येथील ०८ सदनिका, चारकोप सेक्टर-८ कांदिवली येथील ०२ सदनिका, अँटॉप हिल-वडाळा येथील २७ सदनिका, तुंगा पवई येथील ४४ सदनिका, पीएमजीपी मानखुर्द येथील ०१ सदनिका, मालवणी मालाड येथील ०१ सदनिका, गायकवाड नगर मालवणी-मालाड येथील ०१ सदनिका अशा ८४ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

तसेच विकास नियंत्रण नियमावली ३३(५) (७) अंतर्गत मंडळाला प्राप्त झालेल्या सदनिकांमधून घाटकोपर पूर्व येथील ०२ सदनिका, कन्नमवार नगर विक्रोळी येथील ०१ सदनिका, अँटॉप हिल-वडाळा येथील ०८ सदनिका, भायखळा येथील ०६ सदनिका, ताडदेव येथील ०६ सदनिका, लोअर परळ येथील ०४ सदनिका, सायन येथील ०२ सदनिका, जेव्हीपीडी अंधेरी पश्चिम येथील ०७ सदनिका अशा ३६ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे, अर्जदार हा भारतीय नागरिक असणे गरजेचे आहे. अर्जदार अविवाहित असल्यास स्वतःचे आधार कार्ड/पॅन कार्ड, अर्जदार विवाहित असल्यास पती-पत्नी यांचे आधार कार्ड/पॅन कार्ड, अर्जदार घटस्फोटीत असल्यास सक्षम न्यायालयाच्या निकालाची प्रमाणित प्रत अथवा अपील दाखल असल्यास त्याची प्रत (अंतिम निकालाच्या प्रती शिवाय सदनिकेचा ताबा देण्यात येणार नाही) आवश्यक आहे. डिक्री प्रमाणपत्राशिवाय सदनिकेचे वितरण केले जाणार नाही. आरक्षण प्रवर्गाकरिता जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक असून सदर प्रमाणपत्र नसल्यास जातीचा दाखला लागणार आहे. आधार कार्डशी संलग्न असलेला भ्रमणध्वनी क्रमांक लागणार असून अर्जदार आणि त्यांचे पती-पत्नी यांचे दोघांचे ईमेल आयडी अथवा अविवाहित असल्यास स्वतःचा ईमेल आयडी लागणार आहे.

अनामत रकमेचा भरणा केल्यानंतर अर्जदारास बुक माय होमसाठी बटन दिसेल. त्यावर विंग/इमारत क्रमांक, सदनिका क्रमांक, मजला याची माहिती उपलब्ध असेल. अर्जदार त्यांना हवी असणारी सदनिका उपलब्ध असल्यास ती निवडू शकतात. अनामत रकमेचा भरणा केल्यानंतर अर्ज फक्त पाहता येऊ शकेल. अर्जदाराने त्याचा ऑनलाईन

अर्ज ओपन करून त्यामध्ये कोणताही फेरफार करणे शक्य होणार नाही. अर्जदाराने प्रिंटेड पावतीमधील माहिती वाचून बरोबर असल्याची खात्री करावी. सदनिका निश्चिती केल्यानंतर ४८ तासांच्या आत सदनिकेच्या विक्री किंमतीच्या दहा टक्के रक्कम भरणा आवश्यक असेल. रकमेचा भरणा केल्यानंतर ती म्हाडाकडे प्राप्त झाल्याची खात्री करून अर्जदारास ऑनलाईन पद्धतीने सदनिकेची रक्कम भरून घेण्यासाठी तात्पुरते देकार पत्र देण्यात येईल.

अर्जदार यांना सदनिकेची निश्चिती करण्यापूर्वी आवश्यक अनामत रक्कम व अर्ज शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे. अर्जदार यांनी अनामत रकमेचा भरणा करून सदनिका निश्चिती केल्यानंतर ४८ तासांच्या आत सदनिकेच्या विक्री किमतीच्या १० टक्के रक्कम भरणे आवश्यक आहे. या कालावधीमध्ये अर्जदार यांनी सदनिकेच्या विक्री किमतीच्या १० टक्के कमेचा भरणा न केल्यास सदनिकेवरील दावा आपोआप रद्द होईल व भरलेली अनामत रक्कम संपूर्ण मंडळाकडे जमा करण्यात येईल. अनामत रकमेचा भरणा करून अर्जदार यांना एका अनामत रकमेवर एक सदनिका एक वेळेस निश्चितीची करणे शक्य होईल यानंतर अर्जदार यांना तीच सदनिका निश्चिती करावी की झाल्यास ती सदनिका ४८ तासानंतर निश्चिती करता येऊ शकेल परंतु यासाठी पुन्हा अनामत रकमेचा भरणा करणे आवश्यक असेल. जाहिरातीमधील वेळोवेळी रिक्त सदनिकांचा तपशील ऑटोमॅटिक वेबसाईटवर दिसेल या अनुषंगाने अर्जदार अर्ज करू शकतील. अर्जदार यांना सर्व रकमा एनईएफटी/आरटीजीएस/नेट बँकिंग/यूपीआय/डेबिट कार्ड/क्रेडिट कार्डद्वारे ऑनलाईन पद्धतीने करणेच आवश्यक आहे.

**सदनिकांची विक्री किंमत भरणा करावयाच्या अटी व शर्ती:-**

१. अर्जदार यांनी सदनिकेची निश्चिती केल्यानंतर Online पध्दतीने सदनिकेच्या विक्री किंमतीच्या १० टक्के रक्कम ४८ तासांच्या आत भरणे आवश्यक असेल. या कालावधीमध्ये रक्कमेचा भरणा न केल्यास सदनिकेवरचा दावा आपोआप रद्द समजण्यात येईल व भरणा केलेली अनामत रक्कम मंडळाकडे जमा करण्यात येईल. २. अर्जदार यांच्याद्वारे सदनिकेची निश्चितीकरुन सदनिकेच्या विक्री किमंतीच्या १० टक्के रक्कमेचा भरणा केल्यानंतर उर्वरित रक्कम भरण्यासाठी Online पध्दतीने तात्पुरते देकारपत्र देण्यात येईल. अर्जदार यांना तात्पुरते देकारपत्र दिल्यानंतर पुढील ९० दिवसांच्या आत उर्वरित रक्कम भरणे आवश्यक आहे. सदर कालावधीत भरणा न केल्यास अधिकतम ९० दिवसांची मुदतवाढ घेऊन नियमानुसार व्याज आकारणीसह रक्कम भरणे बंधनकारक आहे. यामध्ये कसूर केल्यास सदनिकेचे वितरण कोणतेही कारण न देता, मुदत संपताच रद्द करण्यात येईल. ३. तात्पुरते देकार पत्र दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अर्जदाराने सदनिका नाकारली, विक्री किंमतीचा भरणा विहीत मुदतीमध्ये न केल्यास किंवा कोणत्याही कारणास्तव वितरण रद्द झाल्यास अर्जदाराने सदनिकेच्या किंमतीपोटी भरलेल्या रकमेतून, संबधित सदनिकेच्या विक्री किंमतीच्या ०१ टक्के एवढी रक्कम समपहरण/वजावट करुन उर्वरित रक्कम कोणतेही व्याज न देता परत करण्यात येईल. ४. सदनिकेच्या विक्री किंमतीचा भरणा करण्यासाठी अर्जदारास वित्तिय संस्थेकडून गृहकर्ज घ्यावयाचे असल्यास अशा अर्जदारांनी ज्या वित्तिय संस्थेकडून कर्ज घ्यावयाचे आहे, त्या वित्तिय संस्थेचे Pre-Sanctioned Letter आपल्या Login ID मधुन upload करणे गरजेचे आहे. यानंतर सदर बँकेच्या नावे व अर्जदाराच्या Login ID मध्ये कार्यालयाद्वारे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल. ५. सदनिकेच्या रकमेचा व मुद्रांक शुल्काचा भरणा केल्यानंतर सदनिकेचे वाटप व ताबा पत्र देण्यात येईल.

मुंबई मंडळाने या योजनेतील सदनिकांच्या वितरणासाठी किंवा याबाबतच्या कोणत्याही कामासाठी कोणालाही प्रतिनिधी/ सल्ला देणारा वा प्रॉपर्टी एजंट म्हणून नियुक्त केलेले नाही. अर्जदारांनी कोणत्याही अनधिकृत व्यक्तीशी परस्पर पैशांचा व्यवहार केल्यास त्याला मुंबई मंडळ (म्हाडा) जबाबदार राहणार नाही. तसेच अर्जदारास कोणी दलाल / व्यक्ती परस्पर अर्ज विक्री किंवा म्हाडाच्या नावे पैसे उकळणे किंवा फसवणूक करणे इ. बाबी करताना आढळल्यास म्हाडाच्या मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्राधिकरण यांच्याशी ०२२-६६४०५४४८ दूरध्वनी क्रमांकावर तसेच मिळकत व्यवस्थापक/पणन/ मुंबई मंडळ यांच्याशी ०२२-६६४०५१२३ दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. अर्जदारांनी अधिक माहितीसाठी ९८६९९८८००० हेल्पलाइन क्रमांकावर किंवा उपमुख्य अधिकारी (पणन), मुंबई मंडळ यांच्याशी ई-मेल: dycoem1@gmail.com वर संपर्क साधावा. ऑनलाईन अर्ज करण्यापुर्वी अर्जदारांनी माहिती पुस्तिका व जाहिरात काळजीपुर्वक वाचावी, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

###

(स्वाक्षरीत/-)

(वैशाली गडपाले)

**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. ☎ 022-55405066/77.
Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================

Outward No. : 04/3047063 Dt. 2 February 2026

# Press Release

**Online registration for sale of 120 flats on a "First Come, First Served" basis by MHADA Mumbai Board from 5 February**

**Process for online application submission, payment of deposit, application fee, and flat selection to start from 12 February**

Mumbai, 2 February 2026:- MHADA's Mumbai Housing and Area Development Board has made 120 flats available for sale on a "First Come, First Served" basis from various housing colonies under its jusrisdiction. Online registration for applications will commence on MHADA's official website from 5 February 2026 at 11:00 a.m.

The flats included in this scheme were earlier offered through lotteries but remained unsold due to various reasons. Interested citizens are requested to register their applications on the official website https://bookmyhome.mhada.gov.in and take advantage of this opportunity.

Applicants must first complete registration on MHADA's official website. The process of submitting the online application, paying the security deposit, paying the application fee, and selecting the flat, will begin from 12 February 2026 at 11:00 a.m. After finalising a flat, the applicant must pay 10 per cent of the flat's sale price within 48 hours.

Under the "First Come, First Served" scheme, 84 flats are available for sale which were constructed by MHADA's Mumbai Board include 08 flats at Shimpoli, Kandivali, 02 flats at Charkop Sector-8, Kandivali, 27 flats at Antop Hill–Wadala, 44 flats at Tunga, Powai, 01 flat at PMGP, Mankhurd, 01 flat at Malvani, Malad, 01 flat at Gaikwad Nagar, Malvani–Malad. In addition, under Development Control Regulation 33(5) and 33(7), 36 flats received by the Board and available for sale include 02 flats at Ghatkopar East, 01 flat at Kannamwar Nagar, Vikhroli, 08 flats at Antop Hill–Wadala, 06 flats at Byculla, 06 flats at Tardeo, 04 flats at Lower Parel, 02 flats at Sion, 07 flats at Juhu Vile Parle Development (JVPD), Andheri West

On the date of application, the applicant must be at least 18 years old and must be an Indian citizen. While the required documents include Aadhaar Card and PAN Car for those unmarried while for married applicants: Aadhaar and PAN Cards of both husband and wife. Also Divorced applicants will have to submit a certified copy of the court judgment, or copy of appeal filed (possession of the flat will not be given without the final judgment copy). The flat will not be allotted without the decree certificate.

For reserved categories, a caste validity certificate is required; if not available, a caste certificate must be submitted. A mobile number linked with Aadhaar is mandatory. Applicants must provide email IDs of both husband and wife, or their own email ID if unmarried.

After payment of the security deposit, the applicant will see the "Book My Home" button. Details such as wing/building number, flat number, and floor will be displayed. Applicants can select a flat if it is available.

After paying the security deposit, the application can only be viewed and no changes can be made. Applicants should carefully check the details mentioned in the printed receipt and ensure they are correct.

After finalising the flat, 10% of the sale price must be paid within 48 hours. Once the payment is received by MHADA, a temporary offer letter will be issued online for payment of the remaining amount.

Applicants must pay the required security deposit and application fee before selecting a flat. If the applicant fails to pay 10% of the sale price within 48 hours after flat selection, the claim on the flat will be automatically cancelled, and the entire security deposit will be forfeited to the Board.

With one security deposit, an applicant can finalise only one flat at a time. If the applicant wishes to rebook the same flat after 48 hours, a fresh security deposit will have to be paid again.

Details of vacant flats will be automatically updated on the website from time to time, and applicants can apply accordingly. All payments must be made online only through NEFT/RTGS/Net Banking/UPI/Debit Card/Credit Card. After finalising the flat, the applicant must pay 10% of the sale price online within 48 hours. If the payment is not made within this period, the claim on the flat will be cancelled automatically and the security deposit will be forfeited.

After paying 10% of the sale price, a temporary offer letter will be issued online for payment of the remaining amount. The remaining amount must be paid within 90 days. If not paid within this period, an extension of up to 90 days may be granted with applicable interest as per rules. Failure to comply will result in cancellation of the allotment without any reason after expiry of the period.

If, after issuance of the temporary offer letter, the applicant cancels the flat for any reason, fails to pay the sale price within the prescribed time, or if the allotment is cancelled for any reason, 1% of the flat's sale price will be deducted from the amount paid, and the remaining amount will be refunded without any interest.

If the applicant wishes to take a housing loan from a financial institution, they must upload the Pre-Sanctioned Letter of the concerned institution through their login ID. After this, a No Objection Certificate (NOC) will be issued by the office in the name of the bank through the applicant's login ID.

After full payment of the flat price and stamp duty, the allotment letter and possession letter will be issued.

The Mumbai Board has not appointed any agent, advisor, or property agent or broker for allotment of flats or related work under this scheme. MHADA will not be responsible for any financial transactions carried out by applicants with unauthorised persons. If any broker or individual is found selling applications, collecting money in MHADA's name, or committing fraud, applicants should contact the Chief Vigilance and Security Officer at 022-66405448 or the Estate Manager (Marketing), Mumbai Board at 022-66405123. For more information, applicants may contact the helpline number 9869988000 or email the Deputy Chief Officer (Marketing), Mumbai Board at dycoem1@gmail.com. Applicants are also advised to carefully read the information booklet and advertisement before submitting the online application.

###

(Sd/-)
(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer / MHADA

---